ख्यातनाम अभिनेत्री, गायिका नूरजहाँ यांचे निधन

पान १ वरून ➤ होत्या आणि त्यांनी जी देशभक्तीपर गीते गायली ती पाक जनतेच्या हृदयात कायमची कोरली गेली आहेत. गायनातील त्यांचे स्थान मातेसारखेच अढळ असेल, असे पाकिस्तानातील लोकप्रिय गायिका मेहनाझ बेगम म्हणाल्या.

चित्रपट संगीतात लता मंगेशकरांचा उदय होण्यापूर्वी नूरजहाँचेच साम्राज्य होते. लता मंगेशकरांच्या सुरुवातीच्या काही गाण्यांवर नूरजहाँ च्या शैलीची स्पष्ट छाप होती आणि स्वत: लता मंगेशकरही तशी कबुली देतात. पंजाबी सलवार कुडता आणि पंजाबी धाटणीचा आवाज याची हिंदी चित्रपटसृष्टीला देणगी देणारी ही गायिका ऐन बहरात असताना फाळणीच्या काळात पाकिस्तानात गेली.

'आवाज दे कहाँ है', 'मेरे बचपनके साथी मुझे भूल ना जाना', 'यहा बदला वफा का बेवफाईके सिवा क्या है' अशा असंख्य सुमधूर गाण्यांनी प्रेक्षकांना आपल्या आवाजाची व मुस्लीम सौंदर्याच्या नजाकतीची मोहिनी घालणाऱ्या नूरजहाँची भारतीय चित्रपटसृष्टीतील कारकीर्द अवघी पाच वर्षांची आहे. परंतु या पाच वर्षांतील तिच्या गाण्यांची जादू अजूनही कायम आहे.

लाहोरजवळील कौसूर या गावी २९ ऑक्टोबर १९२९ रोजी जन्मलेल्या नूरजहाँने बेबी नूरजहाँ या नावाने बालकलावंत म्हणून 'मिस्र का सितारा' या चित्रपटापासून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली ती कलकत्ता येथे. तेथेच 'तारणहार', 'फख्र-ए-इस्लाम' आदी चित्रपटांमधून भूमिका केल्यावर ती पुन्हा लाहोरला आली. तेथे 'गुल-ए-बकावली', 'ससी पन्नू', 'यमला जट' (अभिनेता प्राणचा पहिला चित्रपट) आदी चित्रपटातून तिने भूमिका केल्या. १९४२ साली निर्माता दलसुखलाल पंचोली यांनी तिला सर्वप्रथम हिंदी चित्रपटाची नायिका म्हणून करारबद्ध केले. हा चित्रपट तुफान चालला आणि त्यातील नूरजहाँने गायलेल्या 'तू कौनसी बदलीमें मेरे चांद' या गाण्याने लोकप्रियतेचा कळस गाठला.

याच चित्रपटाचे दिग्दर्शक शौकत हुसैन यांच्याशी तिने नंतर विवाह केला.

मी अद्याप तरुण ! तू ?

'गुल-ए-बकावली' या पंजाबी चित्रपटाद्वारे नूरजहाँ पडद्यावर पहिल्यांदा झळकल्या त्यावेळेस त्या अवघ्या १२ वर्षांच्या होत्या. त्यांचा गाजलेला हिंदी चित्रपट म्हणजे 'खानदान'. त्यात प्राण नायक होते. फाळणीमुळे विभक्त झालेल्या कलावंतांच्या मुलाखती अमृतसर दूरदर्शन केंद्राने १९८० साली घेतल्या त्यात प्राण यांचा समावेश होता. यावेळी प्राण यांना विचारले गेले की, 'खानदान'मध्ये तुमची नायिका असलेली नूरजहाँ आता फाळणीनंतर पाकिस्तानात गेली. तिची आठवण होते का ? तेव्हा प्राण उत्तरले, ती नंतर कधी भेटली नाही. आता तर ती म्हातारी झाली असेल. पाकिस्तानात नूरजहाँ त्यावेळेस हा कार्यक्रम पाहत होता. त्यांनी तातडीने लता मंगेशकर यांच्याशी संपर्क साधून प्राण यांचा दूरध्वनी क्रमांक घेतला. प्राण यांना नूरजहाँ यांनी प्रश्न केला की, तू म्हातारा झाला आहेस का ? तू विचार करतोस त्याप्रमाणे माझे वय झालेले नाही !

'खानदान' चालल्यामुळे बी. ए. व्यास तिला 'दुहाई' या चित्रपटासाठी मुंबईला घेऊन आले व हिंदी चित्रपटात गायिका-नायिका म्हणून ती लवकरच स्थापित झाली. फाळणी झाली त्या वेळीं ती आपल्या पतीसोबत पाकिस्तानात निघून गेली. मात्र केवळ पाच वर्षांच्या कालकीर्दीत तिने 'नोकर', 'नादान' (१९४४), 'दोस्त', मा. विनायक यांची 'बडी मां' (या चित्रपटात लता व नूरजहाँ एकत्र पडद्यावर झळकल्या होत्या), भाईजान, गांव की गोरी (१९४५), 'अनमोल घडी', 'हमजोली' (१९४६), 'मिर्झा साहिबा', आदी चित्रपटातून कामे केली व गाणी गायली.

बरेच काही शिकायला मिळाले

कोल्हापूर, (पी.टी.आय.) : गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी नूरजहाँ यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले. त्या मला लहान बहिणीप्रमाणे वागवत. त्यांच्यापासून मला बरेच काही शिकायला मिळाले, असेही लता मंगेशकर यांनी म्हटले आहे. नूरजहाँ आणि आपली पहिली भेट कोल्हापूर येथे झाली आणि त्यांच्या निधनाचे वृत्तही आज येथेच आपल्याला कळले, हा योगायोगच आहे, असे त्या म्हणाल्या. ■

ख्यातनाम चित्रपट अभिनेत्री, गायिका नूरजहाँ यांचे निधन

कराची, २३ डिसेंबर (ए. एफ. पी.)

पाकिस्तानची स्वरसम्राज्ञी म्हणून विख्यात असलेल्या नूरजहाँ या ज्येष्ठ गायिकेचे आज दीर्घकाळच्या आजाराने येथे निधन झाले. त्या ७२ वर्षांच्या होत्या. घरी असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले, असे मीना शाह या त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले.



नूरजहाँ यांच्या निधनाचे वृत्त समजताच पाकिस्तानात हळहळ व्यक्त झाली. एक आख्यायिका आता संपली, असे चित्रपट अभिनेते तलत हुसेन यांनी म्हटले आहे.

साऱ्या पाकिस्तानात 'जहाँ' म्हणून मशहूर असलेल्या नूरजहाँ यांनी गेली चार दशके पाकिस्तानातील सर्वात लोकप्रिय गायिका म्हणून आपला लौकिक कायम राखला. पाकिस्तान व तत्पूर्वी अखंड भारतात पंजाबी व उर्दू भाषेत त्यांनी २० हजारांवर गाणी गायली. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना पाकिस्तानचे लष्करशहा जनरल परवेज मुशर्रफ म्हणाले की, नूरजहाँ यांनी आपल्या अप्रतिम स्वरांनी लोकप्रियतेची उत्तुंग पातळी गाठली आणि रंगभूमीवर वर्चस्व गाजविले. त्या सच्च्या देशभक्त **पान ८ पाहा ➤**